ePaper डोळ्यात मिरची पूड फेकली, लाठ्या-काठ्यांनी मारहाण; पोलिसांवर जीवघेणा हल्ला



वर्ष - 9 | UDYAM-MH-26-0158827

महाईन्यूज ™

WWW.MAHAENEWS.COM | सोमवार, दि. 24 ऑगस्ट 2026 | पुणे, पिंपरी-चिंचवड आवृत्ती | MAHAENEWS.COM | लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!



पान 3 वरुन...

कोंढीच्या 'व्हिलन'वर प्रशासनाची कारवाई!

## राष्ट्रगीताचा मान नाही? सतीश महाना यांच्यावर विरोधकांचा निशाणा

# राष्ट्रगीताचाही भाजपाला विसर?

**महाईन्यूज । लखनौ**

**उत्तर प्रदेश विधानसभेचे अध्यक्ष आणि भाजपाचे नेते सतीश महाना यांचा उन्नाव येथील एका कार्यक्रमातील व्हिडीओ सोशल मीडियावर व्हायरल झाल्याने राजकीय वाद निर्माण झाला आहे. राष्ट्रगीत सुरू असताना महाना कार्यक्रमस्थळावरून निघून आपल्या वाहनात जाऊन बसल्याचे व्हिडीओमध्ये दिसत असल्याचा दावा विरोधकांनी केला आहे. या घटनेवरून काँग्रेस, आम आदमी पक्ष तसेच समाजवादी पक्षाने भाजपावर जोरदार टीका केली आहे.**





सतीश महाना हे उन्नावमधील पूरन नगर येथील एसव्हीएम इंटर कॉलेजमध्ये उत्तर प्रदेश प्रधानाचार्य परिषदेच्या ४६व्या प्रांतीय अधिवेशन, शैक्षणिक संगोष्ठी आणि सन्मान समारंभासाठी प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. कार्यक्रमात प्रोटोकॉलनुसार पोलिसांकडून त्यांना 'गार्ड ऑफ ऑनर' देण्यात आला. त्यानंतर राष्ट्रगीत सुरू झाल्याचे व्हिडीओमध्ये दिसत आहे.

### काँग्रेसचा जोरदार हल्लाबोल

काँग्रेसने हा व्हिडीओ सोशल मीडियावर शेअर करत भाजपावर निशाणा साधला. पक्षाच्या नेत्या सुप्रिया श्रीनेत यांनी सतीश महाना यांच्यावर प्रश्न उपस्थित करत राष्ट्रगीत पूर्ण होण्यासाठी केवळ ५२ सेकंद थांबता आले नाहीत का, असा सवाल केला. राष्ट्रगीताचा हा अपमान असून तो सहन केला जाणार नाही, अशी भूमिका काँग्रेसने घेतली.

या व्हिडीओमुळे संवैधानिक पदावर असलेल्या व्यक्तीने राष्ट्रगीत सुरू असताना कार्यक्रमस्थळ सोडणे योग्य होते का, असा प्रश्न विरोधकांकडून उपस्थित करण्यात आला आहे. मात्र, व्हिडीओतील दृश्यांवरून संपूर्ण घटनाक्रमाचा संदर्भ स्पष्ट होत नसल्याने या प्रकरणावर वेगवेगळे दावे समोर येत आहेत. काँग्रेसने भाजपाच्या राष्ट्रवादाच्या भूमिकेवरही प्रश्नचिन्ह उपस्थित केले. 'वंदे मातरम्'च्या मुद्द्यावरून काँग्रेसवर टीका करणाऱ्या भाजपाने आता आपल्या नेत्याच्या व्हिडीओबाबत स्पष्टीकरण द्यावे, अशी मागणी विरोधकांकडून करण्यात आली.

समाजवादी पक्षाचे अध्यक्ष अखिलेश यादव यांनीही या प्रकरणावर प्रतिक्रिया देत पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ यांनी याबाबत कारवाई करणार का, असा सवाल उपस्थित केला. संवैधानिक पदावर असलेल्या व्यक्तीकडून राष्ट्रगीताच्या वेळी शिष्टाचाराचे पालन अपेक्षित असल्याचे विरोधकांनी म्हटले आहे.

आपण आणि आपल्या सहकाऱ्यांनी संविधान तसेच राष्ट्रगीताचा नेहमीच सर्वोच्च सन्मान केला आहे आणि भविष्यातही करत राहू, असे महाना यांनी सांगितले. सोशल मीडियावर कोणताही व्हिडीओ किंवा घटना शेअर करण्यापूर्वी त्यामागील संपूर्ण तथ्य तपासावे, असे आवाहनही त्यांनी केले.

त्यामुळे सध्या या प्रकरणात एकीकडे व्हायरल व्हिडीओच्या आधारे विरोधकांचे आरोप, तर दुसरीकडे राष्ट्रगीत ज्या ठिकाणी सुरू होते त्या ठिकाणी आपण उपस्थित नव्हतो, असा सतीश महाना यांचा दावा अशी दोन्ही बाजू समोर आली आहे. या घटनेवरून उत्तर प्रदेशातील राजकीय वातावरण मात्र चांगलेच तापले आहे.

### आयोजकांचा वेगळा दावा

दरम्यान, या प्रकरणात आयोजकांकडून वेगळे स्पष्टीकरण देण्यात आले आहे. सतीश महाना ज्या ठिकाणी 'गार्ड ऑफ ऑनर' स्वीकारत होते, त्या ठिकाणापासून राष्ट्रगीत सुरू असलेले सभागृह काही अंतरावर होते. राष्ट्रगीत सभागृहाच्या आत सुरू झाले होते आणि बाहेर त्याच ठिकाणी राष्ट्रगीत सुरू नव्हते, असा दावा आयोजकांनी केला आहे. त्यामुळे व्हायरल व्हिडीओवरून करण्यात येणाऱ्या आरोपांचा संदर्भ पूर्णपणे वेगळा असल्याचे आयोजकांचे म्हणणे आहे.

### सतीश महाना यांचे स्पष्टीकरण

वाद वाढल्यानंतर सतीश महाना यांनी स्वतः सोशल मीडियावर स्पष्टीकरण दिले. त्यांनी व्हायरल व्हिडीओ भ्रामक पद्धतीने सादर केला जात असल्याचे म्हटले आहे. उन्नावमध्ये त्यांना 'गार्ड ऑफ ऑनर' दिला जात असताना त्याच वेळी ऑडिटोरियमच्या आत राष्ट्रगीत सुरू झाले होते आणि त्या वेळी आपण ऑडिटोरियममध्ये उपस्थित नव्हतो, असा दावा महाना यांनी केला. दोन्ही कार्यक्रम वेगवेगळे होते, त्यामुळे राष्ट्रगीताचा अवमान केल्याचा आरोप निराधार असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

### व्हिडीओमध्ये नेमके काय दिसते?

सोशल मीडियावर प्रसारित होत असलेल्या व्हिडीओमध्ये महाना काही काळ सलामीच्या ठिकाणी उभे असल्याचे दिसते. त्यानंतर ते मागे वळतात, मंचावरून खाली उतरतात आणि कार्यक्रमस्थळाच्या दिशेने चालू लागतात. यावेळी काही समर्थक त्यांच्याजवळ येऊन त्यांचे पाय स्पर्श करताना दिसतात. त्यानंतर महाना आपल्या वाहनात बसून तेथून निघून जातात. या संपूर्ण काळात राष्ट्रगीत सुरू असल्याचे व्हिडीओत दिसते.

# आम्ही काफी आहोत ना...

## राहुल गांधींच्या ‘छात्रों की गूंज’मध्ये पुण्यातील मुलींच्या मनातील खदखद

महाईन्यूज । पुणे

**काँग्रेस नेते राहुल गांधी यांच्या ‘छात्रों की गूंज’ कार्यक्रमाला पुण्याच्या वेगवेगळ्या भागांतून मुली, त्यांचे पालक आले होते. या मुलींनी समान संधी आणि स्वातंत्र्याच्या मुद्द्यावर आपल्या मनातील खदखद व्यक्त केली. आता या बदलांची चर्चा गरजेचीच असल्याचा सूरही त्यांनी व्यक्त केला.**




‘एकत्र कुटुंब. त्यात सगळ्या मुली. घरात कोणी आलं की, भाऊ नाही का? असं आपसूकच विचारलं जायचं. पण, भावाची गरजच काय आहे हो भाई! आम्हीच काफी आहोत ना...’ दहावीत शिकणाऱ्या पृथ्वी भोंडवेला कशाचाही धाक नव्हता.

‘समाजाने आतापर्यंत मुली किती चांगल्या असतात, हे पाहिलं. सती-सावित्रीच्या गोष्टी ऐकल्या. आता मुली किती वाईट असू शकतात नि या ‘बॅड गर्ल्स’ काय-काय करू शकतात, हेही समाजाला कळत आहे.’ पृथ्वी आत्मविश्वासाने सांगत होती.

लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांच्या ‘छात्रों की गूंज’मध्ये सहभागी झालेल्या मुली, त्या मुलींचे पालक आणि गांधी काय सांगतात, या उत्सुकतेने आलेल्या मुलग्यांचीही संख्या मोठी होती. या कार्यक्रमाला पृथ्वी तिच्या आईबरोबर, आरती भोंडवे यांच्याबरोबर आलेली. त्यांनाही आयुष्यात खूप काही करायचं होतं. आरती म्हणाल्या, ‘२००७ ला एमपीएससीची परीक्षा दिलेली. कॉलेजमध्ये असताना ‘एनसीसी’मधून दिल्लीतील प्रजासत्ताक दिनाच्या संचलनासाठी निवड झालेली. पण, एवढ्या लांब कसं जायचं. हा समाज अजून बदलला नाही. मुलींचे प्रश्न तसेच आहेत. एवढ्या उशिरा कुठे होतीस, काय करत होतीस वगैरे वगैरे.’

‘माझी मुलगी पृथ्वी आता पैलवान आहे. ७२ किलो वजनी गटात खेळते. तिला आपल्या देशासाठी खेळायचंय. पण, वाट अडथळ्यांचीच आहे. मुलींना खेळण्यासाठी सरकारचाही पाठिंबा नाही. आता आपल्या आजूबाजूला काय सुरू आहे. अशा काळात कुणाचं ऐकायचं. हे तिचं तिला कळलं पाहिजे. दोन-पाच वर्षांनी तिलाही मतदान करायचंय. म्हणून पृथ्वीला या कार्यक्रमाला का घेऊन आले. तिनं हे सगळं बघावं.’ आरती भोंडवे सांगत होत्या.

कात्रजहून आलेली नेहा शेख कॉम्प्युटर इंजिनीअर. भारती विद्यापीठातून नुकतीच पासआऊट झालेली. ‘नोकरी शोधतेय. पण, प्रश्न तेच आहेत. एका बहिणीने ‘एमपीएससी’ दिलेली. आता तिचं लग्न ठरलं. कदाचित तिला अभ्यासही सोडावा लागेल. अजूनही मुलींना त्यांच्या मनाप्रमाणे नोकरी करता येत नाही. आई-वडील, नंतर नवरा. कधीपासून तेच प्रश्न आहेत. राहुल गांधी त्यावर बोलले. काही क्षणांसाठी बरं वाटलं.’ नेहाच्या चेहऱ्यावर काहीसं समाधान दिसत होतं.

विद्यार्थ्यांमध्ये मुलगा-मुलगी दोघांचाही समावेश होतो. मग, राहुल गांधी मुलींसाठी काय वेगळं सांगणार आहेत, या उत्सुकतेने अपूर्वा त्यांच्या मुलाबरोबर बावधनहून आलेल्या. त्या सांगतात, ‘समाजात अजूनही असमानता आहे. अगदी मोठमोठ्या पदांवर असलेल्या, सरकारी अधिकारी असलेल्या महिलांना अनेक वेळा भेदभावाला सामोरं जावं लागतं. राहुल गांधींनी मांडलेले सगळेच प्रश्न गरजेचे होते. थोडाफार भाग सोडला, तर त्यात राजकारण नव्हतं.’ अपूर्वाताईंच्या मुलाने कायद्याचं (एलएलबी) शिक्षण घेतलं आहे.

### मुलींच्या मनातील खदखद समोर

‘छात्रों की गूंज’ ऐकायला आलेल्या मुलांचीही संख्या लक्षणीय होती. मुलींसाठी खास आयोजित केलेल्या या कार्यक्रमाला का आलात, या प्रश्नावर प्रत्येकाकडे वेगवेगळी उत्तरं होती. काहींना राहुल गांधींना प्रत्यक्षात बघायचं होतं. तर हिंजवडीत बायोफार्मा कंपनीमध्ये काम करत असलेल्या अनिकेत खराटेंना गांधी काही वेगळे मुद्दे मांडतील, याची अपेक्षा होती. तर, साताऱ्याहून पुण्यात, पिंपरी-चिंचवडमध्ये नोकरीनिमित्त आलेला अजित राजेंद्र पवारला मुलींचे प्रश्न वेगळे वाटत नाहीत. ‘माझ्याही आयुष्यात आई आहे. बहीण आहे. पत्नी येईल. मुलगीही येईल. मग हे प्रश्न वेगळे कसे?’ अजित विचारतो.

# महिला वादकांच्या वादनातून वंदे मातरम् गीताला मानवंदना

महाईन्यूज । पुणे

**देशभक्तीची ऊर्जा, ढोल-ताशांचा निनाद आणि तरुणाईचा उत्स्फूर्त सहभाग यांचा संगम साधत पुण्यातील विविध ढोल-ताशा वाद्यपथकांमधील महिला वादकांनी वंदे मातरम् गीताला अनोख्या पद्धतीने मानवंदना अर्पण केली. संस्कृती आणि देशप्रेमाचा वारसा पुढे नेणाऱ्या महिला वादकांच्या सामूहिक वादनाने देशभक्तीचा निनाद घुमला.**



ढोल ताशा महासंघ पुणे शहर आणि ढोल ताशा महासंघ महाराष्ट्र यांच्या वतीने या उपक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. ढोल-ताशा वाद्यपथकांमधील महिला वादकांनी एकत्र येत वादनातून वंदे मातरम् गीताला मानवंदना दिली. वंदे मातरमचे अभ्यासक मिलिंद सबनीस, मोनिका मोहोळ, उद्योजिका जान्हवी धारिवाल बालन, अभिनेत्री आदिती द्रविड, मंजिरी सावरकर, ढोल ताशा महासंघ महाराष्ट्राचे अध्यक्ष पराग ठाकूर, शहराध्यक्ष अक्षय बलकवडे, कार्याध्यक्ष अभिजित कुमावत, उपाध्यक्ष अमर भालेराव, खजिनदार मंदार गोसावी, सचिव प्रशांत तांबे, संघटक ओंकार कलढोणकर, कुमार रेणुसे या वेळी उपस्थित होते.

पुणे शहरातील विविध ढोल-ताशा पथकांमधील दोनशेहून अधिक महिला वादकांनी सहभागी होत सामूहिक वादनातून वंदे मातरम् गीताला मानवंदना अर्पण केली.

सबनीस म्हणाले, ‘वंदे मातरम् गीताला अशा पद्धतीने अभिवादन करणे हा वेगळा आणि सुंदर उपक्रम आहे. माते, तुला वंदन असो, असा या गीताचा भाव आहे. या एका गीताला बलिदानाचे अधिष्ठान लाभलेले आहे. त्यामुळे या गीताच्या शब्दांचे सामर्थ्य अधिक वाढले आहे. हे शब्द नष्ट होणारे नाहीत. या गीतावर मूर्तिपूजेच्या संदर्भातून टीका केली जाते; मात्र त्या पलीकडे जाऊन पाहिले, तर हे आईचे, मातृशक्तीचे गौरव करणारे गीत आहे. मातृशक्तीचे प्रतीक असलेल्या या गीताला आजच्या पिढीने अशा पद्धतीने अभिवादन करणे महत्त्वाचे आहे.’

मोहोळ म्हणाल्या, ‘ढोल-ताशांचा निनाद झाला की मनामध्ये नवी उमेद निर्माण होते. सण-उत्सवांमुळे आपल्या परंपरा आणि संस्कृतीविषयी आदर निर्माण होतो. ढोल-ताशा वादनाच्या माध्यमातून तरुणाई आणि महिला आपल्या संस्कृतीशी जोडल्या जात असून, अशा उपक्रमांमधून हा सांस्कृतिक वारसा पुढे नेला जात आहे.’

ठाकूर म्हणाले, ‘ढोल-ताशा वाद्यपथकातील सर्व वादक हे संस्कृतीरक्षक आहेत. परंपरा आणि संस्कृतीचे पालन करण्याचे काम ते करत आहेत. वादन करताना शिस्तीची मर्यादा राखून ढोल-ताशांचा निनाद आणि उत्तम वादन करावे.’

# कोंडीच्या 'व्हिलन'वर प्रशासनाची कारवाई!

## चाकण-तळेगाव मार्गावरील अवजड वाहनांचे अनधिकृत पार्किंग हटविण्यास सुरुवात

**महाईन्यूज । पिंपरी-चिंचवड**

**चाकण-तळेगाव औद्योगिक परिसरातील वाढती वाहतूक कोंडी सोडविण्यासाठी प्रशासनाने आता कठोर पावले उचलण्यास सुरुवात केली आहे. राष्ट्रीय महामार्गाच्या दोन्ही बाजूंना अनधिकृतपणे पार्क करण्यात येणाऱ्या अवजड वाहनांविरोधात पिंपरी-चिंचवड वाहतूक शाखेने धडक कारवाई सुरू केली असून, कालपासून ५० हून अधिक अवजड वाहने टो करून इतरत्र स्थलांतरित करण्यात आली आहेत. संबंधित वाहनचालकांकडून वाहतूक नियमांचे उल्लंघन केल्याप्रकरणी चलनही वसूल करण्यात येत आहे.**

पिंपरी-चिंचवड वाहतूक शाखेचे पोलीस उपायुक्त विक्रांत देशमुख यांनी या कारवाईची माहिती दिली. चाकण आणि तळेगाव औद्योगिक क्षेत्रातील वाहतूक कोंडी, रस्त्यांची दुरवस्था, अनधिकृत पार्किंग आणि अतिक्रमणांच्या समस्यांवर तातडीने उपाययोजना करण्याचे निर्देश जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी आणि पिंपरी-चिंचवड पोलीस आयुक्त विनय कुमार चौबे यांनी काही दिवसांपूर्वी प्रशासनाला दिले होते. त्यानंतर ही कारवाई सुरू करण्यात आली आहे.

चाकण-तळेगाव औद्योगिक परिसरात मोठ्या प्रमाणात उद्योग, कंपन्या आणि उत्पादन प्रकल्प असल्याने दररोज हजारो कामगारांची ये-जा होते. त्याचबरोबर विविध कंपन्यांसाठी कच्चा माल आणि तयार माल घेऊन जाणाऱ्या अवजड वाहनांची मोठ्या प्रमाणात वाहतूक सुरू असते. त्यामुळे महामार्गावर वाहनांची संख्या वाढून अनेक ठिकाणी वारंवार वाहतूक कोंडी निर्माण होते.






### ५० हून अधिक वाहने टो करून हटविली

कालपासून सुरू असलेल्या कारवाईत तब्बल ५० हून अधिक अवजड वाहने टो करून इतरत्र स्थलांतरित करण्यात आली. संबंधित वाहनचालकांकडून वाहतूक नियमांचे उल्लंघन केल्याप्रकरणी चलनही वसूल करण्यात येत आहे.

महामार्गाच्या कडेला अवजड वाहने अनधिकृतपणे उभी राहत असल्याने रस्त्याची वाहतूक क्षमता कमी होते आणि इतर वाहनांना मार्ग काढताना अडचणी निर्माण होतात. यामुळे वाहतूक कोंडीबरोबरच अपघाताचा धोकाही वाढतो. ही परिस्थिती नियंत्रणात आणण्यासाठी वाहतूक पोलिसांकडून अनधिकृत पार्किंगविरोधात कारवाई अधिक तीव्र करण्यात आली आहे.

वाहतूक कोंडी टाळण्यासाठी अवजड वाहनचालकांनी महामार्गाच्या कडेला किंवा वाहतुकीला अडथळा निर्माण होईल अशा ठिकाणी वाहने उभी करू नयेत, असे आवाहन प्रशासनाच्या वतीने करण्यात आले आहे. नियमांचे उल्लंघन करणाऱ्या वाहनांवर यापुढेही कारवाई सुरू राहणार असल्याचे संकेत देण्यात आले आहेत.

चाकण-तळेगाव औद्योगिक पट्ट्यातील वाहतूक व्यवस्था सुरळीत करण्यासाठी अनधिकृत पार्किंगबरोबरच अतिक्रमण आणि इतर वाहतूक समस्यांवरही प्रशासनाकडून उपाययोजना करण्यात येणार आहेत. त्यामुळे औद्योगिक परिसरातील वाहतूक कोंडीला काही प्रमाणात आळा बसण्याची अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

### कोंडी, अतिक्रमणावरही लक्ष

चाकण-तळेगाव औद्योगिक परिसरातील वाहतूक कोंडी, रस्त्यांची दुरवस्था, अनधिकृत पार्किंग आणि अतिक्रमणांच्या समस्येवर तातडीने उपाययोजना करण्याचे निर्देश जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी आणि पिंपरी-चिंचवड पोलीस आयुक्त विनय कुमार चौबे यांनी दिले होते. त्यानंतर ही कारवाई सुरू करण्यात आली.

# वायसीएममध्ये 'एआय डॉक्टर'चा मनमानी प्रयोग?

**महाईन्यूज । पिंपरी-चिंचवड**

**रुग्णांची लक्षणे ऐकून कृत्रिम बुद्धिमत्तेच्या (एआय) माध्यमातून प्राथमिक अहवाल तयार करणारे 'क्लाउड क्लिनिक' मशीन पिंपरी-चिंचवड महापालिकेच्या यशवंतराव चव्हाण स्मृती (वायसीएम) रुग्णालयात बसविण्यात आले आहे. मात्र, या मशीनला वैद्यकीय वापरासाठी कोणते प्रमाणीकरण मिळाले आहे, त्याची तांत्रिक व वैद्यकीय अचूकता कोणी तपासली आणि कोणत्या अधिकृत संस्थेची मान्यता आहे, याबाबत स्पष्टता नसल्याने मशीनच्या वापरावर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.**

शुक्रवारी (दि. २१) त्वचारोग विभागासमोर हे वेब-बेस्ड एआय मशीन बसविण्यात आले. रुग्ण मशीनसमोर उभा राहून स्क्रीनवरील एआय प्रणालीशी संवाद साधणार असून, त्याने सांगितलेल्या लक्षणांवर आधारित प्राथमिक अहवाल तयार होऊन तो डॉक्टरांच्या स्क्रीनवर उपलब्ध होणार असल्याचे सांगण्यात येत आहे. मात्र, वायसीएमच्या गजबजलेल्या बाह्यरुग्ण विभागात मोठ्या प्रमाणात गोंगाट असतो. अशा परिस्थितीत रुग्णाचा आवाज



कितपत अचूकपणे ऐकला जाईल आणि त्यावर आधारित अहवाल किती विश्वासार्ह असेल, हा प्रश्न उपस्थित होत आहे.

संबंधित कंपनीच्या मालकाने रुग्णालयातील २०० रुग्णांवर मशीनचे प्रात्यक्षिक करण्यात येणार असल्याचे सांगितले आहे.

> 'हा पायलट प्रोजेक्ट असून मशीनच्या खरेदीबाबत आम्हाला काहीही माहिती नाही,' त्यामुळे पायलट प्रोजेक्टला परवानगी नेमकी कोणी दिली आणि खरेदी प्रक्रिया कोणत्या आधारावर सुरू आहे, याची माहिती समोर येणे आवश्यक आहे.
> - डॉ. राजेंद्र वाबळे, अधिष्ठाता, वायसीएम रुग्णालय

त्यानंतर खरेदी समितीकडून मशीनची पाहणी केली जाणार असल्याची माहितीही देण्यात आली. त्यामुळे प्रमाणीकरण आणि वैद्यकीय अचूकतेबाबत स्पष्टता नसतानाच खरेदीची प्रक्रिया पुढे नेली जात आहे का, असा सवाल उपस्थित झाला आहे.

बंगळुरू येथील महासेतू कंपनीचे मालक ओमकार गौरीधर यांनी मशीनमध्ये १६४ मापदंड घेता येत असल्याचा दावा केला. कर्करोगासह विविध तपासण्यांसाठी त्याचा उपयोग होऊ शकतो, तसेच लक्षराच्या सीमावर्ती डे-केअर सेंटरसाठीही मशीन पुरविल्याचे त्यांनी सांगितले. मात्र, या दाव्यांची स्वतंत्र अधिकृत पडताळणी होणे बाकी आहे.

दरम्यान, वायसीएममध्ये यापूर्वी एचए कंपनीचे 'क्लाउड क्लिनिक' मशीन वापराअभावी धूळखात पडून असल्याची माहिती समोर आली आहे. जुन्या मशीनचा वापर का थांबला, त्यावर किती खर्च झाला आणि त्याचे मूल्यमापन झाले का, याचा खुलासा झालेला नाही. त्यामुळे जुन्या मशीनच्या वापराबाबत स्पष्टता नसताना नव्या मशीनच्या पायलट प्रोजेक्टची आणि संभाव्य खरेदीची घाई कशासाठी, असा प्रश्न उपस्थित होत आहे.

# बालभारतीत इतिहासाचा ‘बाल’बोध!



## भूमिका

**‘बालभारती’च्या सहावीच्या इतिहासाच्या पाठ्यपुस्तकातील वेदकाळाविषयीची मांडणी ही केवळ अभ्यासक्रमातील चूक म्हणून दुर्लक्षित करता येणार नाही. इतिहास शिकवताना उपलब्ध पुरावे, ग्रंथ आणि सामाजिक वास्तव यांचा वस्तुनिष्ठ विचार होणे आवश्यक असते.**



मात्र वेदकाळातील लोकांचा आहार प्रामुख्याने वनस्पतीजन्य होता आणि वर्णव्यवस्था ही उपजीविकेच्या साधनांवर आधारित होती, अशी सरसकट मांडणी केली जात असेल, तर त्यातून इतिहासाचे सुलभीकरण नव्हे, तर त्याचे विकृतीकरण होण्याचा धोका आहे. वेदकालीन समाजाचा अभ्यास करताना यज्ञ, पशुबळी, विविध खाद्यपदार्थ, सामाजिक रचना आणि तत्कालीन रूढी यांचा संदर्भ महत्त्वाचा ठरतो.

प्राचीन भारतीय समाजात धान्य, दूध, दही, तूप, मध यांसोबत विविध प्रकारचे मांसाहारी पदार्थही वापरले जात असल्याचे अनेक ऐतिहासिक आणि साहित्यिक संदर्भ आढळतात. त्यामुळे एका विशिष्ट आहारपद्धतीला प्राचीन भारताची सार्वत्रिक ओळख देणे योग्य ठरणार नाही. माणूस काय खातो यावरून त्याचे नैतिक किंवा सामाजिक श्रेष्ठत्व ठरवण्याची प्रवृत्तीही तितकीच धोकादायक आहे.

त्याहून गंभीर प्रश्न वर्णव्यवस्थेबाबतच्या मांडणीचा आहे. ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य आणि शूद्र यांच्यात प्रेम, सौहार्द आणि सहकार्याचे संबंध होते, असे सांगताना पुढील काळातील अस्पृश्यता, सामाजिक बहिष्कार आणि जातीय विषमता यांचा इतिहास विद्यार्थ्यांपासून लपवला जाणार नाही ना, याची काळजी घ्यावी लागेल. सावित्रीबाई फुले, महात्मा फुले आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा संघर्ष हा भारतीय समाजातील विषमतेच्या वास्तवाचा महत्त्वाचा पुरावा आहे. हे वास्तव नाकारून सामाजिक सलोख्याचे चित्र रंगवणे म्हणजे विद्यार्थ्यांना अर्धसत्य शिकवणे होय.

इतिहासाचा उद्देश कोणत्याही समाजाला कमी लेखणे नाही; पण गौरवाच्या नावाखाली चुका, अन्याय आणि विषमता झाकणेही इतिहासाचे काम नाही. त्याचप्रमाणे प्राचीन भारताचा अवमान करणे हेही योग्य नाही. इतिहासातील चांगल्या गोष्टींचा अभिमान बाळगताना त्यातील सामाजिक दोष मान्य करण्याची प्रगल्भता समाजात निर्माण झाली पाहिजे.पाठ्यपुस्तक हे विद्यार्थ्यांच्या विचारविश्वाचा पाया असते. त्यामुळे त्यातील प्रत्येक विधान पुराव्याधारित, संतुलित आणि चिकित्सक असणे आवश्यक आहे. आहार, जात, धर्म किंवा सामाजिक स्थान यांपैकी कोणत्याही आधारावर श्रेष्ठ-कनिष्ठतेची भावना रुजणार नाही, याची विशेष काळजी घेतली पाहिजे. इतिहास बदलण्याऐवजी इतिहास समजून घेण्याची दृष्टी मुलांना दिली पाहिजे.

‘बालभारती’ने या प्रकरणातील आक्षेपार्ह किंवा अपूर्ण मांडणीचे पुनरावलोकन करून तज्ज्ञांच्या मदतीने आवश्यक सुधारणा कराव्यात. कारण बालवयात शिकवलेले अर्धसत्य पुढे पूर्वग्रह बनते. विद्यार्थ्यांना गौरवगाथा नव्हे, तर सत्याशी प्रामाणिक असलेला इतिहास हवा. अन्यथा इतिहासाच्या नावाखाली ‘बाल’भारतीच तयार होईल.

## प्रासंगिक »

### आरशातले सत्य

**एका गावात गणेश नावाचा तरुण राहत होता. तो हुशार होता; पण स्वतःची चूक कधीच मान्य करत नसे. गावात एखादा वाद झाला की तो नेहमी दुसऱ्यालाच दोष देत असे. एकदा गावातील पाण्याच्या टाकीची नळी फुटली. पाणी वाया जाऊ लागले.**

गावकऱ्यांनी गणेशला दोष दिला, कारण त्याने आदल्या दिवशी नळीची दुरुस्ती केली होती. गणेश म्हणाला, “मी काही केले नाही. नळी आधीपासूनच खराब होती.”

गावच्या सरपंचांनी कोणावरही आरोप न करता नळीची पाहणी केली. तपासणी करताना गणेशने लावलेला एक सैल जोड आढळला. तोच जोड निघाल्यामुळे नळी फुटली होती. गणेशला आपली चूक समजली. त्याने सर्वांसमोर माफी मागितली आणि स्वतःच्या पैशाने नळी दुरुस्त करून घेतली.

सरपंच म्हणाले, “चूक होणे हा अपराध नाही; पण चूक माहीत असूनही ती लपवणे ही मोठी चूक आहे.” त्या दिवसापासून गणेशने आपली चूक स्वीकारण्याची सवय लावली. हळूहळू गावकऱ्यांचा त्याच्यावरचा विश्वास पुन्हा निर्माण झाला.

- तात्पर्य : **स्वतःची चूक स्वीकारण्याचे धैर्य माणसाला अधिक विश्वासार्ह बनवते.**

जंतर-मंतरवरील विद्यार्थ्यांच्या आंदोलनावर झालेल्या पोलिस कारवाईची चौकशी करण्यासाठी सर्वोच्च न्यायालयाने निवृत्त न्यायाधीश आणि माजी पोलिस अधिकाऱ्यांची उच्चस्तरीय समिती नेमणे ही अत्यंत महत्त्वाची बाब आहे.

## विद्यार्थ्यांच्या आवाजाला सर्वोच्च न्यायालयाचा आधार!



लोकशाहीत आंदोलनाचा अधिकार जितका महत्त्वाचा, तितकाच कायदा-सुव्यवस्था राखण्याचा अधिकार प्रशासनाला आहे. मात्र हा अधिकार वापरताना बळाचा वापर कितपत आवश्यक आणि प्रमाणबद्ध होता, याचे उत्तर मिळणे गरजेचे आहे.

नीट परीक्षेतील कथित पेपरफुटी, परीक्षा व्यवस्थेतील त्रुटी आणि गुणवत्तेच्या प्रश्नांमुळे विद्यार्थ्यांमध्ये आधीच असंतोष निर्माण झाला होता. त्यात शिक्षणव्यवस्थेतील असमानता, वाढते कोचिंग क्लासेस, आर्थिकदृष्ट्या दुर्बल विद्यार्थ्यांपुढील अडचणी आणि शासन-प्रशासनाकडून अपेक्षित संवादाचा अभाव यांची भर पडली. अशा परिस्थितीत विद्यार्थ्यांच्या प्रश्नांकडे केवळ कायदा-सुव्यवस्थेचा प्रश्न म्हणून पाहणे योग्य ठरत नाही.

आंदोलनादरम्यान लाठीमार, अश्रुधूर, पेलेट गन किंवा इतर साधनांचा वापर झाल्याचे आरोप गंभीर आहेत. त्याचप्रमाणे पोलिसांवर आंदोलकांकडून हल्ला झाला असेल, तर त्याचीही निष्पक्ष चौकशी होणे आवश्यक आहे. चौकशीचा उद्देश कोणाला दोषी ठरवणे नसून सत्य शोधणे हा असला पाहिजे.सर्वोच्च न्यायालयाने स्वतंत्र उच्चस्तरीय समिती स्थापन करून या प्रकरणाचे गांभीर्य अधोरेखित केले आहे. त्यामुळे समितीने कोणत्याही राजकीय दबावाला बळी न पडता उपलब्ध पुरावे, व्हिडिओ, प्रत्यक्षदर्शींची साक्ष आणि पोलिसांच्या कारवाईचे आदेश यांचा सखोल अभ्यास करणे अपेक्षित आहे. विशेषतः विद्यार्थिनींशी गैरवर्तन झाले असल्यास त्याची स्वतंत्रपणे दखल घेणे गरजेचे आहे. या घटनेचा सर्वांत मोठा धडा म्हणजे विद्यार्थ्यांचा आवाज दडपून समस्या सुटत नाहीत. उलट दडपशाहीमुळे असंतोष अधिक तीव्र होतो. शिक्षणव्यवस्थेतील त्रुटी दूर करण्यासाठी शासनाने विद्यार्थ्यांशी संवाद साधला पाहिजे. परीक्षा पारदर्शक, विश्वासार्ह आणि सर्वांसाठी समान संधी देणारी असणे ही केवळ विद्यार्थ्यांची नव्हे, तर देशाच्या भवितव्याची गरज आहे.उच्चस्तरीय समितीचा अहवाल केवळ कागदावर न राहता त्यातील शिफारशींवर ठोस कारवाई झाली, तरच या चौकशीला अर्थ प्राप्त होईल. विद्यार्थ्यांना न्याय, शिक्षणव्यवस्थेला विश्वासार्हता आणि प्रशासनाला उत्तरदायित्व मिळणे— हीच या समितीकडून खरी अपेक्षा!

## ।। अभंगवाणी ।।



वृत्ति भूमि राज्य द्रव्य उपार्जिती ।
जाणा त्या निश्चितीं देव नाहीं ॥१॥

भाडेकरी वाहे पाठीवरी भार ।
अंतरींचें सार लाभ नाहीं ॥ध्रु.॥

- संत तुकाराम

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक-संपादक श्री. अधिकराव दिवे-पाटील** यांनी छत्रपती शिवाजी महाराज गोल मंडई, गाळा क्र. ७९/८०, संत तुकारामनगर, पिंपरी, पुणे-४११०१८ येथे पुणे विभागीय कार्यालयामधून प्रसिद्ध केले आहे. एमएसएमई नोंदणी क्रमांक : MH-26-0158827. या वृत्तपत्रात डिजीटल स्वरूपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक-संपादक सहमत असतीलच असे नाही.
**मुख्य कार्यकारी संपादक : वैष्णव जाधव | वृत्त संपादक : अविनाश आदक.** (सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील.) विशेष सूचना : हा अंक कोणत्याही प्रकारच्या प्रिंटसाठी नाही. गौरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.

# ‘भुलेश्वरचा राजा’ मिरवणुक दुर्घटनेत दोघांचा मृत्यू

## मुख्यमंत्री मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी मिरवणुकीतील दुर्घटनेवर प्रतिक्रिया दिली

**महाईन्यूज । मुंबई**

**मुंबईतील ‘भुलेश्वरचा राजा’च्या आगमन सोहळ्याच्या मिरवणुकीत शनिवारी (२२ ऑगस्ट) रात्री एक मोठी दुर्घटना घडली. भुलेश्वरच्या राजाच्या आगमन मिरवणुकीदरम्यान दोघांचा मृत्यू झाला आहे. मूर्ती मंडपात आणत असताना मूर्तीचा तोल गेल्याने अचानक अपघात घडला आणि त्यामध्ये दोन जण जखमी झाले, तर दोघांचा मृत्यू झाला आहे.**



या घटनेत जखमी झालेल्या गणेशभक्तांना रुग्णालयात दाखल करण्यात आलं असून त्यांच्यावर उपचार सुरू आहेत. दरम्यान, या घटनेनंतर राज्याचे मुख्यमंत्री मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी एक्सवर (ट्विटर) पोस्ट शेअर करत या दुर्घटनेत प्राण गमावलेल्या गणेशभक्तांना श्रद्धांजली अर्पण केली आहे.

गणपतीची २७ फूटी मूर्ती घेऊन अखिल भुलेश्वर सार्वजनिक गणेशोत्सव मंडळाचे कार्यकर्ते व पदाधिकारी भुलेश्वरमधील कबुतरखाना येथे वाजत गाजत आणत होते. रात्री ९ वाजून ५१ मिनिटांच्या सुमारास ही मूर्ती परिसरात आली असताना अचानक ती खाली कोसळून मंडळाचे कार्यकर्ते व पदाधिकाऱ्यांच्या अंगावर पडली. या अपघातात चौघे जखमी झाले. मंडळाचे अध्यक्ष व शिवसेना उपविभाग प्रमुख संकेत नेवशे (वय ३३) यांचा उपचारादरम्यान मृत्यू झाला. तसेच ब्रिजेश जोशी (वय ३०) यांच्या छातीला मार लागल्याने त्यांचा उपचारादरम्यान मृत्यू झाला.

मंडळाच्या कार्यकर्त्यांनी माध्यमांशी बोलताना म्हटलं की, ज्या ठिकाणी अपघात झाला, तिथे एक मोठा खड्डा होता. त्यावेळी मूर्ती एका बाजूला कलंडली आणि कोसळली. दुसऱ्या एका कार्यकर्त्याने म्हटलं की, पार्किंगमुळे रस्त्यावर अडचण निर्माण होते. तसेच रस्त्याची अवस्थाही अतिशय खराब आहे. स्थानिक रहिवाशांनी म्हटलं की, रस्त्यावर मोठ मोठे खड्डे आहेत. त्यामुळे हा अपघात घडला असावा.

घटनेची माहिती मिळताच मुंबई अग्निशमन दल, मुंबई पोलीस, वाहतूक पोलीस, १०८ रुग्णवाहिका सेवा आणि महापालिकेच्या कर्मचाऱ्यांनी तातडीने घटनास्थळी धाव घेतली. बचाव पथकांनी मूर्तीखाली अडकलेल्या नागरिकांना बाहेर काढून रुग्णालयात दाखल केले.

दरम्यान, प्राथमिक तपासात मूर्तीला मागील बाजूने देण्यात आलेला आधार किंवा त्याचे वेल्डिंग तुटल्यामुळे मूर्तीचा तोल गेल्याचा अंदाज व्यक्त करण्यात आला आहे. मात्र, दुर्घटनेचे नेमके कारण अधिकृत तपासानंतरच स्पष्ट होणार आहे. पोलिसांकडून या प्रकरणाची चौकशी सुरू आहे.

या घटनेनंतर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी ती अत्यंत दुर्दैवी आणि मन हेलावून टाकणारी असल्याचे म्हटले. दुर्घटनेत प्राण गमावलेल्या गणेशभक्तांना त्यांनी भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण केली. या घटनेच्या पार्श्वभूमीवर गणेश मंडळांनी आगमन सोहळे साधेपणाने आणि सुरक्षिततेला प्राधान्य देत पार पाडावेत, असे आवाहनही करण्यात येत आहे.

### मुख्यमंत्री फडणवीस काय म्हणाले?

“मुंबईतील भुलेश्वर परिसरात ‘भुलेश्वरचा राजा’ गणेशमूर्तीच्या आगमन मिरवणुकीदरम्यान घडलेली दुर्घटना अत्यंत दुर्दैवी आणि मन हेलावून टाकणारी आहे. या दुर्घटनेत दोन गणेशभक्तांचा मृत्यू झाला असून काही गणेशभक्त जखमी झाले आहेत. जखमी गणेशभक्तांना तातडीने रुग्णालयात दाखल करण्यात आलं असून त्यांच्यावर आवश्यक ते उपचार सुरू आहेत. जखमींची प्रकृती लवकरात लवकर सुधारावी, यासाठी ईश्वरचरणी प्रार्थना करतो. या दुर्घटनेत प्राण गमावलेल्या गणेशभक्तांना भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण करतो”, अशी प्रतिक्रिया मुख्यमंत्र्यांनी दिली.

# मनोज जरांगे यांच्या आंदोलनासाठी मुंबईत आझाद मैदानाची पाहणी

**महाईन्यूज । मुंबई**

**मराठा आरक्षणाच्या मागणीसाठी मनोज जरांगे पाटील यांनी पुन्हा एकदा आंदोलनाची हाक दिली असून, येत्या २९ ऑगस्ट रोजी मुंबईतील आझाद मैदानावर उपोषण करण्याची तयारी सुरू झाली आहे. या पार्श्वभूमीवर रविवारी मराठा समाजाच्या पदाधिकाऱ्यांनी आझाद मैदानाची पाहणी केली. आंदोलनासाठी आवश्यक व्यवस्था आणि संभाव्य गर्दीचा आढावा यावेळी घेण्यात आला.**



मराठा समाजाला देण्यात आलेली कुणबी जात प्रमाणपत्रे पडताळणी प्रक्रियेत बाद ठरत असल्याचा मुद्दा जरांगे यांच्या आंदोलनामागे प्रमुख कारण ठरत आहे. विशेषतः स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांमध्ये इतर मागासवर्गीयांसाठी राखीव असलेल्या जागांवर विजयी झालेल्या काही मराठा-कुणबी आणि कुणबी-मराठा उमेदवारांची प्रमाणपत्रे पडताळणीत बाद होत असल्याने जरांगे पाटील यांनी सरकारविरोधात आक्रमक भूमिका घेतली आहे.

मागील वर्षीही २९ ऑगस्ट रोजी जरांगे पाटील यांनी मुंबईत आंदोलन केले होते. त्या आंदोलनाच्या पार्श्वभूमीवर सरकारकडून मराठा समाजाच्या मागण्यांबाबत काही आश्वासने देण्यात आली होती. मात्र, ही आश्वासने पूर्णपणे प्रत्यक्षात आली नसल्याचा आरोप आंदोलनाच्या नेत्यांकडून केला जात आहे. याच पार्श्वभूमीवर यंदा पुन्हा मुंबईत आंदोलन करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.

आंदोलनासाठी मराठा क्रांती मोर्चाच्या पदाधिकाऱ्यांनी मुंबई पोलीस आयुक्त तसेच आझाद मैदान पोलीस ठाण्याकडे परवानगीसाठी अर्ज केला आहे. आंदोलन शांततापूर्ण आणि लोकशाही मार्गाने करण्यात येणार असल्याचे आंदोलकांकडून स्पष्ट करण्यात आले आहे. पोलिसांना आंदोलनाबाबत आवश्यक माहिती आणि नोटीस देण्यात आल्याचेही सांगण्यात आले आहे.

जरांगे पाटील यांना राज्यभरातून मोठ्या प्रमाणात समर्थन मिळत असल्याने २९ ऑगस्ट रोजी मुंबईत मोठी गर्दी होण्याची शक्यता आहे. त्यामुळे वाहतूक व्यवस्थेवरही परिणाम होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. प्रशासन आणि पोलीस यंत्रणेसमोर आंदोलन शांततेत पार पाडण्याबरोबरच गर्दीचे नियोजन करण्याचे आव्हान असणार आहे.

### कुणबी प्रमाणपत्रांचे वाटप

दरम्यान, मागील आंदोलनानंतर राज्य शासनाकडून मोठ्या प्रमाणावर कुणबी प्रमाणपत्रांचे वाटप करण्यात आले. मात्र, प्रमाणपत्रांच्या पडताळणीदरम्यान काही प्रमाणपत्रे बाद होत असल्याचा मुद्दा आता पुन्हा चर्चेत आला आहे. या प्रक्रियेत महसूल विभागाच्या भूमिकेवरही जरांगे पाटील यांनी प्रश्न उपस्थित केले आहेत. जरांगे पाटील यांच्याशी संवाद साधण्याची जबाबदारी जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे-पाटील यांच्यावर असल्याचेही वृत्तात नमूद करण्यात आले आहे. त्यामुळे २९ ऑगस्टच्या आंदोलनापूर्वी सरकार आणि मराठा आंदोलक यांच्यात चर्चा होते का, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

# रेल्वेमध्ये महिलेच्या मृतदेहाचे तुकडे

## भाड्याच्या घरापर्यंत पोहोचला पोलिसांचा तपास; CCTV फुटेजमुळे संशयित जोडप्याचा माग

**महाईन्यूज । चेन्नई**

**चेन्नईत घडलेल्या एका भीषण हत्येचा तपास आता वेगाने पुढे सरकत आहे. आग्रा कँट रेल्वे स्थानकावर तमिळनाडू एक्स्प्रेसच्या डब्यात लाल रंगाच्या सुटकेसमध्ये मानवी शरीराचे तुकडे आढळल्यानंतर पोलिसांनी तपास सुरू केला. या तपासात CCTV फुटेजच्या मदतीने पोलिसांना चेन्नईतील एका भाड्याच्या घरापर्यंत पोहोचता आले आहे.**



६ ऑगस्ट रोजी आग्रा कँट स्थानकावर तमिळनाडू एक्स्प्रेसच्या जनरल डब्यात एक संशयास्पद लाल सुटकेस आढळली. सुटकेसमधून दुर्गंधी येत असल्याने रेल्वे कर्मचाऱ्यांनी तिची तपासणी केली. त्यावेळी आत मानवी शरीराचे कुजलेले अवशेष आढळून आले. सुरुवातीला मृत व्यक्तीची ओळख पटली नव्हती. मात्र, तपास पुढे गेल्यानंतर पोलिसांना या प्रकरणाचा धागा चेन्नईशी जोडलेला असल्याचे आढळले.

पोलिसांनी चेन्नई सेंट्रल रेल्वे स्थानकावरील CCTV फुटेज तपासले. त्यामध्ये एक पुरुष आणि एक महिला लाल सुटकेस घेऊन स्थानकात दाखल झाल्याचे दिसून आले. दोघांनी ही सुटकेस तमिळनाडू एक्स्प्रेसच्या जनरल डब्यात ठेवली आणि त्यानंतर ते स्थानकातून बाहेर पडल्याचे CCTV मध्ये दिसले. तपासासाठी रेल्वे स्थानकांवरील शेकडो CCTV फुटेज तपासण्यात आले.

या तपासादरम्यान पोलिसांना चेन्नईच्या गुडुवांचेरी परिसरातील एका भाड्याच्या घराचा संशय आला. हे घर एका पुरुष आणि महिलेने भाड्याने घेतल्याची माहिती समोर आली आहे. या घरातच महिलेची हत्या करून मृतदेहाचे तुकडे करण्यात आले असावेत, असा प्राथमिक संशय पोलिसांनी व्यक्त केला आहे. घरातून मोठे भांडे आणि इतर काही वस्तू तपासासाठी जप्त करण्यात आल्या आहेत. मात्र, संशयितांची ओळख आणि त्यांचे मृत व्यक्तीशी नेमके संबंध अद्याप स्पष्ट झालेले नाहीत.

सुटकेसमध्ये चेन्नईचा उल्लेख असलेली पॉलिथीन बॅग, तसेच काही पावत्या आणि इतर वस्तू सापडल्याने तपासाला महत्त्वाचे धागेदोरे मिळाले. पोलिस मृत व्यक्तीची ओळख निश्चित करण्यासाठी बेपत्ता व्यक्तींच्या नोंदी तपासत आहेत. दरम्यान, मृतदेहाचे अवशेष शवविच्छेदनासाठी पाठवण्यात आले असून मृत्यूचे नेमके कारण शोधण्याचा प्रयत्न सुरू आहे.

या प्रकरणात तांत्रिक पुरावे, मोबाईल लोकेशन आणि प्रवासाशी संबंधित माहिती महत्त्वाची ठरण्याची शक्यता आहे.

दरम्यान, मृत व्यक्तीची ओळख पटवणे हे पोलिसांसमोरील सर्वात महत्त्वाचे आव्हान आहे. मृतदेहाची ओळख पटल्यास हत्येमागील कारण, आरोपी आणि मृत व्यक्तीतील संबंध तसेच गुन्ह्याचा संपूर्ण घटनाक्रम समोर येण्यास मदत होऊ शकते. त्यामुळे पोलिसांकडून बेपत्ता व्यक्तींची माहिती आणि उपलब्ध पुराव्यांची पडताळणी केली जात असून, या धक्कादायक हत्येचा लवकरच पूर्ण उलगडा होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

### CCTV फुटेजमुळे संशयित जोडप्याचा माग

या प्रकरणातील संशयित पुरुष आणि महिलेचा शोध घेण्यासाठी पोलिसांकडून विविध ठिकाणी तपास सुरू आहे. CCTV, रेल्वे प्रवासाचे रेकॉर्ड आणि इतर तांत्रिक पुराव्यांच्या आधारे संपूर्ण घटनाक्रम उलगडण्याचे प्रयत्न सुरू आहेत. त्यामुळे या 'सुटकेस हत्ये'मागचे नेमके कारण आणि आरोपी कोण, याचा उलगडा होणे बाकी आहे. याशिवाय, पोलिसांनी चेन्नईतील संशयित घराचा परिसर तसेच रेल्वे स्थानकांवरील CCTV फुटेजची बारकाईने तपासणी सुरू केली आहे. संशयितांनी सुटकेस कुठून आणली, ती रेल्वे स्थानकापर्यंत कशी पोहोचवली आणि त्यानंतर ते कोणत्या मार्गाने निघून गेले, याचा तपास केला जात आहे.

---

# भारताने उद्ध्वस्त केलेलं 'जैश-ए-मोहम्मद'चं मुख्यालय पाकिस्तानात पुन्हा उभं

**महाईन्यूज । पाकिस्तान**

**जम्मू-काश्मीरमधील पहलगाममध्ये २२ एप्रिल २०२५ रोजी झालेल्या दहशतवादी हल्ल्यानंतर भारताने ऑपरेशन सिंदूर राबवत पाकिस्तानला चांगलाच धडा शिकवला होता. भारताने 'एअर स्ट्राईक' करत दहशतवादी हल्ल्याला जोरदार प्रत्युत्तर दिलं होतं. ऑपरेशन सिंदूरच्या माध्यमातून पाकिस्तान हद्दीतील दहशतवादी तळ उद्ध्वस्त केले होते.**




भारताने 'ऑपरेशन सिंदूर'च्या माध्यमातून दहशतवाद्यांच्या ९ तळांनाही उद्ध्वस्त केलं होतं. यामध्ये 'जैश-ए-मोहम्मद'च्या मुख्यालयाचाही समावेश होता. भारताने केलेल्या कारवाईत 'जैश-ए-मोहम्मद'चा हा तळ भुईसपाट झाला होता. भारताने केलेल्या या कारवाईला आता एक वर्ष होऊन गेलं आहे. मात्र, आता एक धक्कादायक माहिती समोर आली आहे.

भारताने 'ऑपरेशन सिंदूर'मध्ये उद्ध्वस्त केलेलं 'जैश-ए-मोहम्मद'चं मुख्यालय पुन्हा उभारण्यात आल्याची माहिती समोर आली आहे. पाकिस्तानमधील बहावलपूरमधील 'जैश-ए-मोहम्मद'चं मुख्यालय व प्रशिक्षण तळ 'मरकझ सुभान अल्लाह' हे पुन्हा बांधण्यात आल्याची माहिती उपग्रह छायाचित्रांमधून समोर आली आहे. या संदर्भातील वृत्त इंडिया टुडेने दिलं आहे.

वृत्तानुसार, पाकिस्तानमधील बहावलपूर येथे 'जैश-ए-मोहम्मद'च्या मुख्यालयाची पुनर्बांधणी करण्यात आली आहे. हेच तळ भारताने 'ऑपरेशन सिंदूर'च्या माध्यमातून एका वर्षापूर्वी उद्ध्वस्त केलं होतं. पण आता हा तळ पुन्हा उभारण्यात आल्याची धक्कादायक माहिती समोर आल्याने खळबळ उडाली आहे. उपग्रह छायाचित्रांमध्ये या परिसरात नव्याने बांधकाम झाल्याचे स्पष्ट संकेत दिसत असून, मुख्य इमारतीवरील नुकसानही दुरुस्त करण्यात आल्याचे दिसते. या पुनर्बांधणीमुळे पाकिस्तानमध्ये दहशतवादी संघटनांच्या पायाभूत सुविधांवर पुन्हा काम सुरू असल्याबाबत गंभीर प्रश्न उपस्थित झाले आहेत.

### ऑपरेशन सिंदूर काय होतं?

पहलगाम दहशतवादी हल्ल्यानंतर पाकिस्तानला धडा शिकवण्यासाठी भारताने सुरू केलेल्या 'ऑपरेशन सिंदूर'ला एक वर्ष पूर्ण झालं आहे. २२ एप्रिल २०२५ रोजी पहलगाम येथे झालेल्या दहशतवादी हल्ल्यांमध्ये २५ पर्यटक आणि स्थानिकांचा मृत्यू झाला होता. त्यानंतर भारताने 'ऑपरेशन सिंदूर'च्या माध्यमातून पाकिस्तान आणि पाकव्याप्त काश्मीरमधील (POJK) दहशतवादी तळांवर अत्यंत अचूक आणि यशस्वी हल्ले केले होते. या हल्ल्यांमध्ये पाकिस्तानचं मोठं नुकसान झालं होतं. ७ मे २०२५ रोजी भारताने पाकिस्तानवर पहाटेच्या सुमारास हल्ला करत तब्बल ९ दहशतवादी तळ उद्ध्वस्त केले होते आणि यामध्ये १०० हून अधिक दहशतवादी ठार झाले होते.



# श्वेता तिवारीच्या आरोपांवर शालिनी ठाकरे संतापल्या

अभिनेत्री श्वेता तिवारी आणि महाराष्ट्र नवनिर्माण सेनेदरम्यानचा सोशल मीडिया वाद आता आणखी चिघळला आहे. सोशल मीडियावर महिलांविरोधात वापरल्या जाणाऱ्या आक्षेपार्ह आणि अश्लील भाषेविरोधात आवाज उठवत श्वेता तिवारीने काही ट्रोलर्सचे स्क्रीनशॉट शेअर केले होते. यातील एका व्यक्तीचा उल्लेख तिने डॉक्टर म्हणून केला होता, तर त्याच्या सोशल मीडिया प्रोफाइलवरून तो राज ठाकरे आणि मनसेचा समर्थक असल्याचं दिसत असल्याचा दावा तिने केला होता. यानंतर श्वेताने थेट मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांनाच सवाल करत, 'असे लोक तुमचे समर्थक असतील तर त्यांचं हे वर्तन तुम्हाला मान्य आहे का?' असा प्रश्न उपस्थित केला होता. श्वेता तिवारीच्या या भूमिकेनंतर आता मनसेच्या पदाधिकारी शालिनी ठाकरे यांनी तिच्यावर थेट निशाणा साधला आहे.




# 'टॉक्सिक'च्या ॲडव्हान्स बुकिंगचा धुमाकूळ

गेल्या अनेक महिन्यांपासून बॉलिवूडचा अभिनेता गोविंदा आणि त्याची पत्नी सुनिता आहुजा यांच्या वैवाहिक आयुष्यात खळबळ उडाली होती. मात्र, आता या संपूर्ण वादावर पडदा पडला आहे. सुनिता आहुजा यांनी गोविंदाविरोधात दाखल केलेली घटस्फोटाची याचिका अखेर मागे घेतली असून, गोविंदाचे मॅनेजर शशी सिन्हा यांनी या वृत्ताला अधिकृत दुजोरा दिला आहे. काही दिवसांपूर्वी सुनिता या वांद्रे येथील कौटुंबिक न्यायालयात (फॅमिली कोर्ट) दिसल्या होत्या, तेव्हापासूनच विविध चर्चांना उधाण आले होते. आता त्या याचिका मागे घेण्यासाठीच न्यायालयात गेल्याचे स्पष्ट झाले आहे. 'हिंदुस्तान टाईम्स'शी बोलताना गोविंदाचे मॅनेजर शशी सिन्हा यांनी सांगितले की, "सगळे इतके का घाबरत आहेत? सुनिताजींनी आपली केस मागे घेतली आहे, ही तर अत्यंत आनंदाची आणि सुखाची गोष्ट आहे. कोर्टात जाताना त्या खूप रागात दिसत असल्यामुळे सर्वांना काहीतरी मोठी अडचण वाटली असावी; पण आता दोघांमधील सर्व वाद मिटले असून परिस्थिती पूर्ववत झाली आहे." शशी सिन्हा यांनी कौटुंबिक वाद चव्हाट्यावर आल्याबद्दल खंतही व्यक्त केली. "घरातील भांडणे घरातच सुटायला हवीत. बसून चर्चा केली की अनेक प्रश्न सुटतात. जर आज केस मागेच घ्यायची होती, तर ती आधी का दाखल केली? आज संपूर्ण जगासमोर आमचा तमाशा झाला, याचे नक्कीच वाईट वाटते," असे ते म्हणाले. गेल्या काही काळापासून सुनिता यांनी गोविंदावर अनेक गंभीर आणि वादग्रस्त आरोप केले होते.

# 'आवारापन 2'ची बॉक्स ऑफिसवर घोडदौड कायम

इमरान हाश्मीचा बहुप्रतिक्षित रोमँटिक ॲक्शन ड्रामा 'आवारापन 2' बॉक्स ऑफिसवर जोरदार कमाई करताना दिसत आहे. 14 ऑगस्ट रोजी प्रदर्शित झालेल्या या चित्रपटाने पहिल्याच आठवड्यात प्रेक्षकांचे लक्ष वेधून घेतले. काही प्रमाणात संमिश्र प्रतिक्रिया मिळूनही चित्रपटाच्या कमाईवर त्याचा फारसा परिणाम झालेला नाही.'विशेष म्हणजे, पहिल्या 'आवारापन' चित्रपटाशी जोडलेल्या प्रेक्षकांच्या आठवणी आणि इमरान हाश्मीची लोकप्रियता याचा या चित्रपटाला मोठा फायदा झाल्याचे दिसत आहे. रिलीजच्या अवघ्या आठ दिवसांत चित्रपटाने भारतात 119 कोटी रुपयांची नेट कमाई केल्याचा दावा करण्यात आला आहे. 'आवारापन 2'ने प्रदर्शनाच्या पहिल्याच दिवशी 22 कोटी रुपयांची कमाई करत बॉक्स ऑफिसवर दमदार सुरुवात केली होती. त्यानंतर चित्रपटाची कमाई सातत्याने सुरू राहिली आणि पहिल्या आठवड्यात त्याने तब्बल 113.50 कोटी रुपये जमा केले. आता दुसऱ्या आठवड्याची सुरुवातही चांगली झाली आहे. सुरुवातीच्या ट्रेंडनुसार, चित्रपटाने रिलीजच्या आठव्या दिवशी म्हणजेच दुसऱ्या शुक्रवारी 5.50 कोटी रुपयांची कमाई केली. त्यामुळे भारतातील चित्रपटाची एकूण नेट कमाई 119 कोटी रुपयांवर पोहोचली आहे. 'आवारापन 2'ची ही कमाई इमरान हाश्मीसाठीही महत्त्वाची मानली जात आहे. दिलेल्या आकडेवारीनुसार, हा चित्रपट त्याच्या सोलो चित्रपटांपैकी सर्वाधिक कमाई करणाऱ्या चित्रपटांमध्ये आघाडीवर पोहोचला आहे. पहिल्या भागाची लोकप्रियता आणि अनेक वर्षांनंतर आलेल्या सिक्वेलबद्दलची उत्सुकता यामुळे प्रेक्षक मोठ्या संख्येने थिएटरकडे वळल्याचे चित्र आहे. चित्रपटाने आपली कमाईची गती कायम ठेवली तर तो आणखी मोठे विक्रम आपल्या नावावर करू शकतो. 'आवारापन 2' आता वर्षातील सर्वाधिक कमाई करणाऱ्या टॉप 5 चित्रपटांच्या यादीत स्थान मिळवण्याच्या उंबरठ्यावर आहे. त्यासाठी चित्रपटासमोर अक्षय कुमारच्या 'वेलकम टू द जंगल'च्या 137.93 कोटी रुपयांच्या लाइफटाइम कलेक्शनचा आकडा गाठण्याचे लक्ष्य आहे. सध्या 'आवारापन 2'ने 119 कोटी रुपये कमावले आहेत.



# ऑस्ट्रेलियाचा बांगलादेशवर दणदणीत विजय

## दुसऱ्या कसोटीत बांगलादेशवर १ डाव आणि ५१ धावांनी मोठा विजय

**महाईन्यूज** । लंडन

**ऑस्ट्रेलियाने पहिल्या कसोटीतील लाजिरवाण्या पराभवाचा बदला घेत बांगलादेशचा दुसऱ्या कसोटीत मोठा पराभव केला. कांगारू संघाने दुसऱ्या कसोटीत १ डाव आणि ५१ धावांनी दणदणीत विजय मिळवला. हा दुसरा कसोटी सामना अवघ्या दीड दिवसात संपला. ऑस्ट्रेलियाच्या या विजयाचं श्रेय मिचेल स्टार्कसह इतर गोलंदाजी विभागाला जातं. बांगलादेशने ऑस्ट्रेलियाला कडवी झुंज दिली, पण स्टार्क-कमिन्सच्या गोलंदाजी माऱ्यापुढे बांगलादेशला पराभव पत्करावा लागला.**




बांगलादेशने दोन सामन्यांच्या कसोटी मालिकेतील पहिल्या सामन्यात ऑस्ट्रेलियावर विजय मिळवत ऐतिहासिक कामगिरी केली आहे. कसोटी इतिहासात बांगलादेशने प्रथमच ऑस्ट्रेलियाच्या मायभूमीत ऑस्ट्रेलिया संघाचा पराभव केला होता. बांगलादेशने तिन्ही विभागात उत्कृष्ट कामगिरी करत हा विजय मिळवला होता.

दुसऱ्या कसोटी सामन्यात १० बळी घेत ऑस्ट्रेलियाच्या विजयात मोलाची भूमिका बजावणारा मिचेल स्टार्क या सामन्याचा हिरो ठरला. त्याने पहिल्या डावात सहा आणि दुसऱ्या डावात चार फलंदाजांना बाद केलं. कसोटी सामन्यात १० बळी घेण्याची कामगिरी स्टार्कने साधण्याची ही चौथी वेळ आहे. ऑस्ट्रेलियाने दुसऱ्या कसोटीत विजय मिळवला असला तरी संघाचा फलंदाजी विभाग चिंतेचा विषय ठरला आहे.

ऑस्ट्रेलिया आणि बांगलादेश कसोटी सामना दीड दिवसात संपला. २२ ऑगस्टला सुरू झालेला कसोटी सामना २३ ऑगस्टला संपला. पहिल्या दिवशी प्रथम फलंदाजी करताना, स्टार्कच्या भेदक गोलंदाजीसमोर बांगलादेशला आपल्या पहिल्या डावात केवळ ६४ धावा करता आल्या. ऑस्ट्रेलियालाही पहिल्या डावात मोठी धावसंख्या उभारता आली नाही; पण, बांगलादेशच्या अल्प धावसंख्येमुळे ऑस्ट्रेलियाला १४६ धावांची आघाडी घेता आली. ऑस्ट्रेलियाने पहिल्या डावात २१० धावा केल्या.

बांगलादेशचे फलंदाज ऑस्ट्रेलियन गोलंदाजीच्या माऱ्यासमोर दुसऱ्या डावातही टिकू शकले नाहीत. परिणामी, दुसऱ्या डावातही ते १०० धावांच्या आतच सर्वबाद झाले आणि त्यांना केवळ ९५ धावा करता आल्या. दुसऱ्या कसोटीच्या निकालासह ऑस्ट्रेलिया आणि बांगलादेश यांच्यातील मालिकेचा निकाल लागला. या दोन्ही संघांमधील कसोटी मालिका १-१ अशी बरोबरीत सुटली.

# भारतीय फिरकीपटू कर्ण शर्माची सर्व प्रकारच्या क्रिकेटमधून निवृत्तीची घोषणा!

**महाईन्यूज** । नवी दिल्ली

**भारतीय संघाकडून, आयपीएलमध्ये व देशांतर्गत क्रिकेटमध्ये खेळणाऱ्या भारताच्या फिरकीपटूने आंतरराष्ट्रीय क्रिकेटमधून निवृत्तीची घोषणा केली आहे. ३८ वर्षीय कर्ण शर्माने युपी टी-२० लीगमध्ये खेळताना निवृत्तीची घोषणा केली. कर्ण शर्माने २०१४ मध्ये भारतासाठी अखेरचा सामना खेळला होता. याशिवाय आयपीएलमध्ये तो खेळताना दिसला आहे. आयपीएल २०२५ मध्ये कर्ण शर्मा मुंबई इंडियन्सकडून खेळताना दिसला होता.**




भारतासाठी चार आंतरराष्ट्रीय सामने खेळलेला ३८ वर्षीय लेग-स्पिनर कर्ण शर्मा याने क्रिकेटच्या सर्व फॉरमॅटमधून निवृत्ती जाहीर केली आहे. त्याने भारतासाठी आपला शेवटचा सामना २०१४ मध्ये खेळला होता आणि त्यानंतर त्याला भारतीय संघाचा भाग होण्याची पुन्हा संधी मिळाली नाही. आयपीएलमध्ये त्याने चेन्नई सुपर किंग्स, मुंबई इंडियन्स, रॉयल चॅलेंजर्स बेंगळुरू आणि सनरायझर्स हैदराबाद यांसारख्या प्रमुख संघांचं प्रतिनिधित्व केलं आहे.

ईएसपीएन क्रिकइन्फोच्या (ESPN Cricinfo) वृत्तानुसार, कर्ण शर्मा २५ ऑगस्ट रोजी आपल्या संघासाठी शेवटचा सामना खेळणार आहे. त्यानंतर तो क्रिकेटच्या सर्व फॉरमॅटमधून निवृत्ती घेणार आहे. आपल्या निर्णयाबाबत बोलताना कर्ण शर्मा म्हणाला, "मला आता निवृत्ती घ्यायची आहे. माझं कुटुंब, बीसीसीआय (BCCI), रेल्वे, यूपीसीए (UPCA), आंध्र प्रदेश क्रिकेट असोसिएशन, विदर्भ क्रिकेट असोसिएशन आणि या प्रवासात मला साथ देणाऱ्या प्रत्येकाचा मी अत्यंत ऋणी आहे. यापुढे मी प्रशिक्षकपद आणि क्रिकेटशी संबंधित इतर जबाबदाऱ्यांसाठी उपलब्ध असेन."

कर्ण शर्माने भारतासाठी एकूण चार आंतरराष्ट्रीय सामने खेळले, ज्यामध्ये एक कसोटी, दोन एकदिवसीय आणि एका टी-२० सामन्याचा समावेश होता. त्याने एकूण पाच बळी घेतले; यात कसोटी सामन्यांमधील चार आणि टी-२० सामन्यांमधील एका बळीचा समावेश आहे. त्याला राष्ट्रीय संघाकडून खेळण्याच्या फारशा संधी मिळाल्या नसल्या, तरी देशांतर्गत क्रिकेटमधील त्याची कामगिरी उत्कृष्ट होती. त्याने फर्स्ट-क्लास, लिस्ट 'ए' आणि टी-२० अशा विविध प्रकारांत मिळून एकूण ५५१ बळी घेतले. कर्णने ९७ फर्स्ट-क्लास सामन्यांत २७०, १२३ लिस्ट 'ए' सामन्यांत १५३ आणि १९१ टी-२० सामन्यांत १६८ बळी घेतले.

कर्ण शर्माच्या आयपीएल कारकिर्दीतील सर्वात मोठी कामगिरी म्हणजे सलग तीन वर्षांत तीन वेगवेगळ्या संघांकडून खेळताना आयपीएलचं विजेतेपद मिळवणं. त्याने २०१६ मध्ये सनरायझर्स हैदराबाद, २०१७ मध्ये मुंबई इंडियन्स आणि २०१८ मध्ये चेन्नई सुपर किंग्सकडून खेळताना हे विजेतेपद पटकावलं. २०१८ मध्ये तिसरे विजेतेपद जिंकल्यानंतर, सलग तीन वर्षे वेगवेगळ्या संघांकडून खेळून ही स्पर्धा जिंकणाऱ्या खेळाडूंच्या एका प्रतिष्ठित गटात त्याचा समावेश झाला. त्याने २०२५ मध्ये मुंबई इंडियन्ससाठी आपला शेवटचा आयपीएल सामना खेळला.

स्मार्ट PCMC SMART CITY

# महाईन्यूज™

epaper.mahaenews.com

पिंपरी-चिंचवड, मावळ आवृत्ती

ePaper

। सोमवार ।

दि. 24 ऑगस्ट 2026 ।

D Y PATIL INTERNATIONAL UNIVERSITY
AKURDI PUNE

Think | Thrive | Transform

SCAN TO APPLY

## B.Sc. FORENSIC SCIENCES (Hons.)



**Be the Reason Behind the Truth.**

A multidisciplinary program that blends science, technology and investigation to analyze evidence, solve crimes and deliver justice.

### WHY CHOOSE THIS PROGRAM?

**EXPERIMENTAL LEARNING**
Hands-on training in modern laboratories, crime scene simulation and case studies.

**FUTURE-READY SKILLS**
Exposure to DNA Technologies and advanced analytics.

**FLEXIBLE CAREER PATHS**
Choose between industry internships, research projects or dissertation to become a specialist in your domain.

### WHAT YOU WILL LEARN

- Crime Scene Investigation
- Forensic Biology & DNA Analysis
- Forensic Chemistry & Toxicology
- Forensic Psychology
- Cyber Forensics
- Criminology & Criminal Law
- Digital & Computational Forensics

+91-8600091180 admission@dypiu.ac.in www.dypiu.ac.in

# ‘हाऊसफुल्ल’ तुकाराम मुंढे.. ‘भेसळमुक्त महाराष्ट्राचा निर्धार’

## अन्नभेसळ, नैतिकता, प्रशासन आणि डिजिटल युगावर मुंढेंची परखड भूमिका

**महाईन्यूज । पिंपरी- चिंचवड**

**राज्याच्या अन्न व औषध प्रशासन विभागाचे आयुक्त तुकाराम मुंढे यांच्या प्रकट मुलाखतीच्या कार्यक्रमाला पिंपरी-चिंचवडकरांनी तुडुंब प्रतिसाद दिला. दिशा सोशल फाऊंडेशनच्या तीने शनिवारी (२२ ऑगस्ट) चिंचवड येथील प्रा. रामकृष्ण मोरे नाट्यगृहात हा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. ‘भेसळमुक्त महाराष्ट्र, आरोग्यदायी महाराष्ट्र’ हा विषय केंद्रस्थानी ठेवून ज्येष्ठ पत्रकार मयुरेश कोण्णूर यांनी तुकाराम मुंढे यांच्याशी मनमोकळा संवाद साधला.**



या कार्यक्रमात ‘नीट यूजी २०२६’ परीक्षेत महाराष्ट्रात प्रथम आलेली श्रावणी कृष्णकांत कुदळे, जागतिक शूटिंग स्पर्धेतील रौप्यपदक विजेती खेळाडू शौर्या दिलीप भरणे आणि पूर्व उच्च माध्यमिक शिष्यवृत्ती परीक्षेत महाराष्ट्रात प्रथम क्रमांक मिळवलेला क्षितीजय प्रवीण नप्ते यांचा तुकाराम मुंढे यांच्या हस्ते सन्मान करण्यात आला.

प्रेरणा शिक्षण संस्थेतील इयत्ता नववीची विद्यार्थिनी महक जमू जहागिरदार हिने तुकाराम मुंढे यांच्या प्रेरणादायी व्यक्तिमत्त्वावर उत्स्फूर्त भाषण केले. पत्रकार शफी पठाण लिखित ‘तुकाराम’ या पुस्तकातील मजकुराचे श्रीकांत चौगुले यांनी अभिवाचन केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक नाना शिवले यांनी केले. सानिका कांबळे हिने आभार मानले. या मुलाखतीत मुंढे यांनी, अन्नातील भेसळ, नागरिकांची जबाबदारी, नैतिकता, प्रशासनातील कार्यपद्धती, कर्तव्याला दिलेले महत्त्व आणि आतापर्यंतच्या प्रशासकीय प्रवासातील अनुभव अशा विविध मुद्द्यांवर परखड आणि अभ्यासपूर्ण मते व्यक्त केली.

तुकाराम मुंढे म्हणाले की.. झोपलेल्या व्यक्तीला जागं करता येतं. मात्र झोपल्याचं सोंग घेतलेल्या व्यक्तीला जागं करता येत नाही. ज्ञान आणि माहितीच्या बाबतीत आपण चिकित्सक असतो. मात्र, अन्नपदार्थांच्या बाबतीत तोच चिकित्सकपणा दिसत नाही. माणसाने शरीराने नव्हे तर वैचारिकदृष्ट्या देखील निरोगी असावे. भेसळ पदार्थांची असते. तशीच ती विचारांची देखील असते. प्रत्येकवेळी प्रवाहाच्या विरुद्ध जाणं, हे शहाणपणाचं नाही. मात्र, योग्य प्रवाह ओळखणे आवश्यक आहे. सध्याच्या डिजिटल युगात आपण काय ऐकतो, काय पाहतो, कोणते विचार आपल्यापर्यंत येतात आणि त्याचे आपण नेमके काय करतो हे लक्षात घेणे महत्त्वाचे आहे. यापूर्वी माहिती मिळवण्यासाठी कष्ट पडत होते. आता तीच माहिती क्षणार्धात मोबाईलवर येते.

यातील ‘अल्गोरिदम’मुळे दुसरी बाजू समोर येत नाही, ती समजून घेतली पाहिजे. थेटपणे लाईक, फॉरवर्ड केल्याचा काय परिणाम होऊ शकतो, याचा विचार केला पाहिजे. मोबाईलमुळे घराघरात संवाद कमी झाला आहे. आपण मोबाईलमध्ये गुरफटून जात आहोत.

सोशल मीडियाच्या बाबतीत नवीन पिढी वेगवान आणि एनर्जी असणारी आहे. त्यांनी ‘रील’ऐवजी ‘रियालिटी’ काय आहे, याचा विचार केला पाहिजे. अगोदर मी साधासुधा होतो. आताही तसाच आहे. आतून एक बाहेरून एक, असा माझा स्वभाव नाही. मी निस्वार्थीपणे सत्याचा स्वीकार करतो. जे काही करायचे, ते पारदर्शक पध्दतीने करायचे, अशी आई-वडिल आणि भावाची शिकवण आहे, त्याचे मी पालन करतो. मला बदल्या आणि दबाव याची भीती वाटत नाही. नियम हे केवळ बंधन नसून लोकहित साधण्यासाठीचे माध्यम आहे.

सगळेच अधिकारी काम करतात. कामाची पद्धत योग्य की अयोग्य हा ज्याचा त्याचा प्रश्न आहे. मी कधीही माझ्या आधीच्या अधिकाऱ्यांनी काय केले, हे पाहत नाही. तुलना करणे योग्य वाटत नाही. त्यापेक्षा आपण घेतलेल्या निर्णयांचा नागरिकांना अपेक्षित फायदा होतोय का, याचा विचार करणे जास्त महत्वाचे आहे. हलाखीची परिस्थिती असू शकते. मात्र तशा परिस्थितीमुळे नैतिकतेशी तडजोड करणे योग्य ठरत नाही. तुम्ही गरीब आहात म्हणून चुकीचा मार्ग निवडणे हा पर्याय असू शकत नाही. तुमच्याकडे बौद्धिक प्रामाणिकपणा नसेल तर मिळणारे यश तात्पुरते असते आणि तेही चिरंतन टिकणारे नसते.

एखाद्या व्यक्तीला देवत्व देणे किंवा दानवत्व देणे खूप धोकादायक आहे. प्रत्येक जण माणूस आहे. तो चुकू शकतो. “मी पब्लिक सर्व्हन्ट आहे. निवृत्तीनंतर काय करायचं, हे आत्ताच ठरवलेलं नाही आणि सर्वच गोष्टींचा आताच खुलासा करता येणार नाही.

### तेंडूलकरपेक्षा माझा भाऊ खूपच मोठा

प्रामाणिक, कडक शिस्तीचे अधिकारी म्हणून ओळखले जाणारे आणि पिंपरी पालिकेच्या प्रशासकीय सेवेत असताना कौतुकास्पद कामगिरी करणारे सेवानिवृत्त उपजिल्हाधिकारी अशोक मुंढे यांचा यावेळी महापौर रवी लांडगे यांच्या हस्ते विशेष सन्मान करण्यात आला. मुलाखतीत बोलताना, तुकाराम मुंढे यांनी आपल्या बंधूंचे म्हणजेच अशोक मुंढे यांचं आयुष्यातील महत्वपूर्ण स्थान अधोरेखित केलं. सचिन तेंडुलकरच्या भावापेक्षा माझा भाऊ खूप मोठा आहे, असे म्हणत त्यांनी अशोक मुंढे यांच्या कार्याविषयी अभिमान व्यक्त केला. यावर उपस्थितांनी टाळ्यांचा कडकडाट केला.

# पिंपरी-चिंचवड पोलिस दलात मोठा फेरबदल; १० निरीक्षकांच्या महत्त्वाच्या ठिकाणी नियुक्त्या

**महाईन्यूज । पिंपरी- चिंचवड**

**पिंपरी-चिंचवड पोलिस आयुक्तालयात प्रशासकीय फेरबदल करण्यात आले आहेत. बदलीवर नव्याने हजर झालेल्या १० पोलिस निरीक्षकांना विविध ठिकाणी नियुक्त्या देण्यात आल्या आहेत. गुन्हे शाखा, वाहतूक शाखा आणि विशेष शाखेसह महत्त्वाच्या पोलिस ठाण्यांची जबाबदारी अधिकाऱ्यांकडे सोपविण्यात आली आहे.**




नव्या नियुक्त्यांमुळे शहरातील गुन्हेगारीला आळा घालणे, वाहतूक व्यवस्था सुधारणे आणि कायदा-सुव्यवस्था अधिक सक्षम करण्यावर भर राहणार आहे. संबंधित अधिकाऱ्यांना तत्काळ पदभार स्वीकारण्याचे आदेश देण्यात आले आहेत.

शहराचा वाढता विस्तार आणि त्यासोबत निर्माण होणारी गुन्हेगारी, वाहतूक आणि कायदा-सुव्यवस्थेची आव्हाने पाहता या नियुक्त्यांना महत्त्व प्राप्त झाले आहे. नव्या अधिकाऱ्यांच्या अनुभवाचा प्रशासनाला फायदा होण्याची अपेक्षा आहे. त्यामुळे आगामी काळात गुन्हेगारीविरोधातील कारवाई आणि वाहतूक नियमनाला अधिक वेग येण्याची शक्यता आहे.

### नियुक्त झालेले अधिकारी

अमोल चंद्रकांत गवळी (गुन्हे शाखा), देवेंद्र परशराम चव्हाण (पोलिस आयुक्तांचे वाचक), हेमंत पोपटराव कदम (विशेष शाखा), राजेन्द्र जयवंत निकाळजे (वाहतूक शाखा), सिद्धराम महादेव म्हेत्रे (हिंजवडी पोलिस ठाणे), गीताराम लक्ष्मण शेवाळे (नियंत्रण कक्ष), विजयकुमार गोरख शिंदे (पिंपरी पोलिस ठाणे), प्रशांत ज्ञानोबा आरदवाड (चाकण उत्तर पोलिस ठाणे), सुरेखा शरद घार्गे (गुन्हे शाखा), चंद्रकांत विनायक जाधव (निगडी पोलिस ठाणे).

# दिघीतील हॉटेलमध्ये हुक्क्याचा धूर..!

## स्मोकिंग झोन नसताना ग्राहकांना हुक्का पुरविल्याचा आरोप; पोलिसांची कारवाई

**महाईन्यूज । पिंपरी- चिंचवड**

**दिघीतील मॅग्झीन रोड परिसरातील हॉटेलमध्ये ग्राहकांना हर्बल हुक्का आणि तंबाखू हुक्का पुरविल्याप्रकरणी चौघांविरुद्ध दिघी पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. हॉटेलमध्ये स्वतंत्र स्मोकिंग झोनची व्यवस्था न करता जेवणाच्या टेबलवरच ग्राहकांना हुक्का उपलब्ध करून दिल्याचा आरोप आहे.**



पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, २० ऑगस्ट रोजी रात्री साडेअकराच्या सुमारास हॉटेल ट्री टाऊन, मॅग्झीनकडे जाणारा रोड, दिघी येथे ही कारवाई करण्यात आली. या प्रकरणी पोलिस शिपाई सोमनाथ बाळू खळसोडे यांनी फिर्याद दिली आहे.

आरोपींमध्ये अक्षय तापकीर, समशेर मनसुर अहमद, किशन कुमार श्रवण साहनी आणि अरबाज इम्रान अहमद यांचा समावेश आहे. हे आरोपी हॉटेलमध्ये येणाऱ्या ग्राहकांना हर्बल हुक्का, तंबाखू हुक्का, स्नॅक्स, पाणी व शीतपेय उपलब्ध करून देत असल्याचे पोलिसांच्या निदर्शनास आले.

हॉटेलमध्ये हुक्क्यासाठी फॉईल पेपरवर जळता कोळसा ठेवण्यात आला होता. तसेच हुक्क्याचा धूर सर्वत्र पसरलेला आणि हुक्का फ्लेवरचा वास परिसरात असल्याचे फिर्यादीत नमूद करण्यात आले आहे. ग्राहकांच्या ये-जा करण्याच्या ठिकाणी जळता कोळसा नेला जात असल्याने ठिणग्यांमुळे हॉटेलमधील लाकडी टेबल व इतर साहित्याला आग लागण्याची शक्यता निर्माण होऊन मानवी जीवितास धोका निर्माण होऊ शकतो, असा आरोप पोलिसांनी केला आहे.

या प्रकरणी भारतीय न्याय संहितेतील संबंधित कलमांसह सिगारेट व इतर तंबाखू उत्पादने अधिनियमांतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे. गुन्ह्याचा पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक वरे करीत आहेत.

## ह.भ.प. राजू महाराज ढोरे यांना 'पंडित विष्णू दिगंबर पलुस्कर कला गौरव पुरस्कार'

**महाईन्यूज । पिंपरी- चिंचवड**

**वारकरी संप्रदायाचे भूषण, संतपीठाचे संचालक तथा संतसाहित्य, कीर्तन, अध्यात्म आणि सामाजिक-सांस्कृतिक क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणारे ह.भ.प. राजू शिवाजी ढोरे महाराज यांना अखिल भारतीय गांधर्व महाविद्यालय मंडळ, मुंबई यांच्या वतीने प्रतिष्ठेचा 'पंडित विष्णू दिगंबर पलुस्कर संगीत कला गौरव पुरस्कार' प्रदान करण्यात आला.**




शनिवार, २२ ऑगस्ट २०२६ रोजी वाशी, नवी मुंबई येथील विष्णुदास भावे नाट्यगृहात आयोजित दीक्षांत एवं पुरस्कार प्रदान समारोहात हा सन्मान करण्यात आला. कार्यक्रमास प्रमुख अतिथी म्हणून प्रा. डॉ. सच्चिदानंद जोशी उपस्थित होते.

संपूर्ण भारतातून केवळ दहा मान्यवरांना हा पुरस्कार प्रदान करण्यात आला असून, महाराष्ट्रातून हा सन्मान मिळविणारे ह.भ.प. राजू महाराज ढोरे हे एकमेव मानकरी ठरले आहेत.

ह.भ.प. राजू महाराज ढोरे हे संत तुकाराम महाराजांच्या परंपरेशी जोडलेले आध्यात्मिक विचारवंत आणि कीर्तनकार म्हणून कार्यरत आहेत. कीर्तन, प्रवचन, भजन तसेच विविध सामाजिक आणि सांस्कृतिक उपक्रमांच्या माध्यमातून ते सातत्याने समाजप्रबोधनाचे कार्य करीत आहेत. संत साहित्य, संत विचार आणि वारकरी संस्कृतीचा प्रसार करण्यासोबतच सामाजिक बांधिलकी जपण्याचे कामही त्यांच्या माध्यमातून सुरू आहे.

त्यांच्या मार्गदर्शनाखाली संतपीठ हे संत विचार, कला, शास्त्रीय संगीत, वारकरी परंपरा आणि भारतीय संत संस्कृतीच्या संवर्धनाचे महत्त्वपूर्ण केंद्र म्हणून कार्यरत आहे. जगद्गुरु संत तुकाराम महाराजांसह संत परंपरेचा विचार आणि वारसा नव्या पिढीपर्यंत पोहोचविण्याचे कार्य संतपीठाच्या माध्यमातून सुरू आहे.

त्यांच्या संतसेवा, कलासाधना आणि सामाजिक-सांस्कृतिक योगदानाची दखल घेत हा पुरस्कार प्रदान करण्यात आला. हा सन्मान त्यांच्या वैयक्तिक कार्यासोबतच संतपीठ, वारकरी संप्रदाय आणि संत परंपरेच्या सेवेलाही मिळालेला राष्ट्रीय स्तरावरील गौरव मानला जात आहे.

पुरस्कार स्वीकारताना उपस्थित मान्यवरांनी ह.भ.प. राजू महाराज ढोरे यांच्या कार्याचे कौतुक करून त्यांच्या पुढील सामाजिक, आध्यात्मिक आणि सांस्कृतिक वाटचालीस शुभेच्छा दिल्या.




या कार्यक्रमास संतपीठाच्या संचालिका डॉ. स्वाती मुळे, प्राचार्य डॉ. ज्ञानेश्वर गाडगे यांच्यासह शिक्षक अविनाश भोगील, महेश शेलके, चंद्रकांत गोसावी, विलास कोकाटे, नेहा नाफडे, सुचेता पुजारी, अर्चना देसाई, शोभा जगताप, गौरी हाडके, प्रियांका कोंडेकर, हिरल गोरे, शंभुदेव गायकवाड, संतोष खोटे, चेतन सपकाळ, अखिल पोखरकर तसेच महाराजांचे आप्तेष्ट मोठ्या संख्येने उपस्थित होते.

DTE Code 6310

Approved by AICTE · Accredited by NAAC · Accredited by NBA

PCET- NUTAN

# Nutan Maharashtra Institute of Engineering and Technology

Autonomous Institute | SPPU Affiliated

## Admissions Open for Academic Year 2026–27

| Degree | Programme Name | Choice Code | Intake |
|---|---|---|---|
| B.Tech | Computer Engineering (CE) | 631024510 | 240 |
| B.Tech | Computer Science Engineering (CSE) | 631024210 | 180 |
| B.Tech | Artificial Intelligence & Data Science (AI&DS) | 631099510 | 120 |
| B.Tech | Information Techanology (IT) | 631024610 | 120 |
| B.Tech | CSE Artificial Intelligence (CSE AI) | 631091310 | 60 |
| B.Tech | Electronics and Telecommunication (E&TC) | 631037210 | 120 |
| B.Tech | Mechanical Engineering | 631061210 | 120 |
| B.Tech | Electronics & Computer Engineering | 631084410 | 120 |
| M.Tech | Computer Engineering (CE) | 0631024510 | 12 |
| M.Tech | E&TC (IoT & Sensor System) | 0631095210 | 12 |
| BCA | Bachelor of Computer Applications (BCA) | 0631010110 | 120 |
| MBA | Master of Business Administration (MBA) | 0631010110 | 120 |
| MCA | Master in Computer Application (MCA) | 0631010110 | 120 |
| LL.B. | Bachelor of Laws | 26031 | 60 |
| B.Sc | Cyber and Digital Science (B.Sc) | - | 60 |
| B.Voc. | Bachelor of Vocation (B.Voc.) | - | 180 |

Highest Package for PCET-Nutan
**61 Lakh P.A.**

Average Salary Package
**5.5 Lakh P.A.**

For Admissions Contact:
**8830992988 / 7423080910 / 9028101155**




Scan the QR Code Today to Get More Information

Samarth Vidya Sankul, Vishnupuri, Talegaon Dabhade, Pune – 410507